प्रस्तावना: शासन निर्णय दि.०७/१०/२०२१ व दि.२२/०५/२०२३ च्या अनुषंगाने भिवंडी मनपा कार्यक्षेत्रात घनकचरा संकलन व व्यवस्थापन पद्धतीच्या सनियंत्रणा करिता अंमलबजावणी सुरु करण्याबाबत मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.

राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीच्या सनियंत्रणा करिता ICT Based प्रणालीची अंमलबजावणी करण्याबाबतचा निर्णय नगरविकास विभागाकडील दि.०७/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार सदर कामाच्या अंमलबजावणी करिता आयटीआय लि. या केंद्र शासनाच्या अखत्यारीतील कंपनीची नियुक्ती करण्यात आलेली असून प्रणालीच्या अंमलबजावणीकरिता शासन आणि कंपनी यांच्या थेट करारनामा झाल्याने नमूद अटी शर्तीनुसार भिवंडी शहरातील खालील नमूद प्रॉपर्टी, स्वीपिंग पॉईंट व लिक्वीड पॉईंटवर करणेसाठी जा.क्र.भि.नि.श.म.पा./आरोग्य/१०४९/२०२२, दि.२३/०९/२०२२ च्या सुधारित कार्यादेशानुसार कळविण्यात आले होते.

| S.No. | Component | Total Property / Unit |
|---|---|---|
| 1 | ICT Based waste collection monitoring Technology for Household / Commercial / Other properties. | 200000 |
| 2 | Street Sweeping Monitoring System | 87 Points |
| 3 | Liquid Sweeping Monitoring System | 2526 Points |
| 4 | Training for entire Technology | 1 Training |
| 5 | Post commission on Field support | 1 person for 1 year |
| 6 | GST | 18 % |

वरील प्रमाणे भिवंडी शहरातील प्रॉपर्टी, स्वीपिंग पॉईंट व लिक्वीड पॉईंटवर घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीच्या सनियंत्रणा करिता ICT Based प्रणालीची अंमलबजावणी करिता शासनाकडून १०० टक्के निधी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरो नगरोत्थान योजने अंतर्गत उपलब्ध करून देणेस मान्यतेनुसार ICT Based प्रणालीची अंमलबजावणी करण्याचे काम ३ वर्षांकरिता असून सदर कामास रु.९.०० कोटी इतका खर्च अपेक्षित असून सद्यस्थितीत मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक तथा आयुक्त यांची मान्यता मिळणे कामी विनंती आहे.

प्रशासकीय ठराव क्र. ४६७०     दि. 02/08/2024

भिवंडी शहरातील प्रॉपर्टी, स्वीपिंग पॉईंट व लिक्वीड पॉईंटवर घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीच्या सनियंत्रणा करिता ICT Based प्रणालीची अंमलबजावणी करिता शासनाकडून १०० टक्के निधी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरो नगरोत्थान योजने अंतर्गत उपलब्ध करून देणेस मान्यतेनुसार ICT Based प्रणालीची अंमलबजावणी करण्याचे काम ३ वर्षांकरिता असून सदर कामास येणाऱ्या रु.९.०० कोटी इतक्या खर्चास मंजुरी प्राप्त असून सदर काम सुरु करणे कामी प्रशासक तथा आयुक्त यांची मान्यता मिळणे बाबत प्रशासनाने प्रस्ताव सादर केला आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ२०२० /प्र.क्र.७१(भाग-२)/नवि दि.०६/०६/२०२२ नुसार तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व (१ब) च्या तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (महासभा व स्थायी समितीचे अधिकार) मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मनपा कार्यक्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीच्या सनियंत्रणा करिता ICT Based प्रणालीची अंमलबजावणी करिता नगरविकास विभागाकडील दि.०७/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आय. टी. आय लिमिटेड, मुंबई कंपनीची नियुक्ती करण्यात आली असून भिवंडी शहरातील प्रॉपर्टी, स्वीपिंग पॉईंट व लिक्वीड पॉईंटवर घनकचरा व्यवस्थापन सनियंत्रणा करिता ICT Based प्रणालीद्वारे काम ३ वर्षाकरिता असून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत १०० टक्के निधी मधून सदरचे काम सुरु करण्यास परवानगी देत आहे.

(अजय वैद्य)

**प्रशासक तथा आयुक्त**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**